# लातूर जिल्ह्यातील लुप्त होत चाललेली लोकबोली: एक समाजभाषाशास्त्रीय अभ्यास

**डॉ. अर्चना अनिल गंगावणे**
**मराठी विभाग**
**दयानंद कला महाविद्यालय,लातूर, महाराष्ट्र**

**सारांश**

भाषा ही मानवी समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे, सामाजिक व्यवहाराचे आणि स्थानिक ज्ञानपरंपरेचे प्रभावी माध्यम आहे. प्रमाणभाषेबरोबरच प्रत्येक प्रदेशात विशिष्ट ध्वनी, शब्द, म्हणी, वाक्प्रचार, व्याकरणरचना आणि जीवनपद्धतीशी निगडित असलेल्या लोकबोली विकसित झालेल्या असतात. तथापि, शिक्षण, शहरीकरण, स्थलांतर, प्रसारमाध्यमे, सामाजिक प्रतिष्ठेची बदलती मूल्यव्यवस्था आणि तरुण पिढीतील प्रमाणभाषा व हिंदी-इंग्रजीच्या वाढत्या वापरामुळे अनेक स्थानिक बोलीतील शब्द वापरातून कमी होत आहेत.

प्रस्तुत अभ्यासात लातूर जिल्ह्यातील लुप्त होत चाललेल्या लोकबोलीतील 171 शब्दांचे संकलन, अर्थनिर्धारण आणि उदाहरण-वाक्यांच्या आधारे समाजभाषाशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. संकलित शब्दांमध्ये दैनंदिन व्यवहार, कृषी, पशुपालन, घरगुती वस्तू, दिशा, वेळ, पारंपरिक साधने, अन्नसंस्कृती, नातेसंबंध, व्यक्तीचे गुणधर्म आणि ग्रामीण जीवनाशी संबंधित समृद्ध शब्दसंपदा आढळते. *नादर* (चांगला/योग्य), *न्याहरी* (सकाळचा नाश्ता), *सरकी* (कापसाचे बी), *मातोडा* (माती), *धुपट* (धूर), *बिगीनं* (लवकर), *वटा* (घरासमोरील/मंदिरासमोरील बसण्याची जागा), *आगळ* (दार बंद करण्याचा पारंपरिक घटक), *पांदी* (गावातील पानंद), *खळ* (धान्य काढण्याची जागा), *दुरडी* (भाकरी ठेवण्याचे लाकडी टोपले), *रूमनं* (नांगराची वरची मूठ), *कनिंग* (धान्य साठविण्याची पारंपरिक जागा), *म्या* (मी), *फकस* (फक्त), *म्होरं* (पुढे), *आडरान* (पडीक जमीन), *उकंडा* (पालापाचोळा व शेण टाकण्याची जागा), *ढवारा* (धान्य काढल्यानंतरची पारंपरिक पूजा/जेवण) आणि *सांच्यापारी* (संध्याकाळी) यांसारखे शब्द स्थानिक लोकजीवनाशी असलेले बोलीचे घनिष्ठ नाते स्पष्ट करतात.

अभ्यासातून असे दिसून येते की ही शब्दसंपदा केवळ भाषिक वेगळेपणाचे प्रतीक नसून लातूर जिल्ह्याच्या कृषी-सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण आहे. त्यामुळे या लोकबोलीचे क्षेत्रीय सर्वेक्षण, ध्वनिमुद्रण, शब्दकोश निर्मिती आणि डिजिटल संग्रह करणे अत्यावश्यक आहे.

**की-वर्ड्स :** लातूर जिल्हा, लोकबोली, बोलीभाषा, मराठी बोली, मराठवाडा, भाषिक वारसा, लोकसंस्कृती, शब्दसंपदा, समाजभाषाशास्त्र, भाषासंवर्धन.

## प्रस्तावना

भाषा ही केवळ विचारांची देवाणघेवाण करण्याचे साधन नसून समाजाच्या जीवनपद्धतीचे प्रतिबिंब आहे. एखाद्या प्रदेशातील लोक कोणत्या वस्तूंना काय म्हणतात, निसर्गातील घटकांचे वर्गीकरण कसे करतात, शेतीतील साधने आणि प्रक्रियांना कोणती नावे देतात, नातेसंबंध कसे संबोधतात आणि दैनंदिन अनुभव कशा शब्दांत व्यक्त करतात, यावरून त्या प्रदेशाच्या सामाजिक-सांस्कृतिक रचनेचा अभ्यास करता येतो.

लातूर जिल्ह्याची भाषिक रचना ऐतिहासिक, भौगोलिक आणि सामाजिक संपर्कामुळे विविधांगी आहे. Census of India च्या District Census Handbook नुसार लातूर जिल्ह्यात मराठी ही प्रमुख भाषा असून उर्दू आणि हिंदी यांचाही लक्षणीय वापर आहे; तसेच कन्नड, तेलुगू, बंजारी, लमाणी/लंबाडी इत्यादी भाषिक समुदायही आढळतात.

2011 च्या Census C-16 मध्ये मातृभाषेची माहिती जिल्हा, तालुका आणि शहरी-ग्रामीण पातळीवर नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्याचा भाषिक अभ्यास करताना प्रमाण मराठीच्या आकडेवारीबरोबर स्थानिक लोकबोलीतील सूक्ष्म शब्दवैशिष्ट्यांचा स्वतंत्र अभ्यास करणे आवश्यक ठरते.

प्रस्तुत अभ्यासाचा विशेष भर लातूर जिल्ह्यातील ग्रामीण लोकबोलीतील वापरातून कमी होत चाललेल्या शब्दांवर आहे.

**अभ्यासाची गरज**

लातूर जिल्ह्यातील ग्रामीण जीवनात पूर्वी मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे अनेक शब्द आजच्या तरुण पिढीमध्ये तुलनेने कमी प्रमाणात ऐकायला मिळतात. उदाहरणार्थ, *म्या* ऐवजी *मी*, *म्होरं* ऐवजी *पुढे*, *कवा* ऐवजी *केव्हा*, *लई* ऐवजी *खूप*, *नक्कर* ऐवजी *थोडे*, *येळ* ऐवजी *वेळ*, *डोस्क* ऐवजी *डोके* आणि *शनवार* ऐवजी *शनिवार* यांसारखी प्रमाणरूपे अधिक प्रचलित होत आहेत.

यामुळे बोलीतील शब्दांचे दस्तऐवजीकरण करणे ही भाषिक गरज तर आहेच; परंतु त्याचबरोबर हे शब्द ग्रामीण जीवनातील पारंपरिक ज्ञानाचे प्रतिनिधित्व करतात. उदाहरणार्थ, *रूमनं, धाव, उकरी, काणी, वेसन, खळ, दुरडी, आटोळा, धुरा, उकंडा* यांसारख्या शब्दांमधून पारंपरिक कृषीव्यवस्थेचे ज्ञान जतन झालेले आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

१. लातूर जिल्ह्यातील लुप्त होत चाललेल्या लोकबोलीतील शब्दांचे संकलन करणे.
२. संकलित शब्दांचे प्रमाण मराठीतील अर्थ निश्चित करणे.
३. प्रत्येक शब्दाचा व्यवहारातील वापर उदाहरण-वाक्यांच्या आधारे स्पष्ट करणे.
४. लोकबोलीतील शब्दांचे विषयानुसार वर्गीकरण करणे.
५. कृषी आणि ग्रामीण संस्कृतीशी संबंधित शब्दसंपदेचे दस्तऐवजीकरण करणे.
६. पिढ्यानुसार बोलीतील शब्दांच्या वापरात होत असलेल्या बदलाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आधार निर्माण करणे.
७. लातूर लोकबोलीचा शब्दकोश तयार करण्यासाठी प्राथमिक शब्दसंग्रह उपलब्ध करून देणे.
८. लोकबोलीच्या संवर्धनासाठी शास्त्रीय उपाय सुचविणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत अभ्यासात उपलब्ध केलेल्या तक्त्यातील 171 लोकबोली शब्दांचा प्राथमिक भाषिक दस्तऐवज म्हणून वापर करण्यात आला आहे. प्रत्येक शब्दासाठी त्याचा लोकबोलीतील प्रकार, प्रमाण मराठीतील अर्थ आणि उदाहरण-वाक्य यांचा विचार करण्यात आला आहे. या शोध लेखात महाराष्ट्रातील लातूर जिल्ह्यांतील विविध गावांमधून भाषिक सामग्री संकलित केले आहे.

या शोध लेखातील शब्द प्रत्यक्ष भेटी,मुलाखती,चर्चा मधून घेतले असून त्यांचे प्रमाण मराठीतील अर्थ/समतुल्य रूप संशोधनात्मक सोयीसाठी दिले आहे. विविधस्थानिक गावानुसार अर्थ किंवा उच्चारात फरक असण्याची शक्यता असू शकते.

**तक्ता १.लातूर जिल्ह्यातील लुप्त होत चालेली लोकबोली शब्द**

| क्र. | लातूर लोकबोलीतील शब्द | प्रमाण मराठीतील अर्थ | उदाहरण-वाक्य |
|---|---|---|---|
| १ | नादर | चांगला किंवा योग्य | मला नादर माहिती मिळाली. |
| २ | न्याहरी | सकाळचा नाश्ता | त्याला न्याहरीला काय तरी दे. |
| ३ | सरकी | कापसाचे बी | त्या पट्यात सरकी लाऊ या. |
| ४ | रातरशा | रात्रीची वेळ | रातरशा कशाला जातोस तेथे |
| ५ | मातोडा | माती | मातोड्यात खेळू नकोस. |
| ६ | धुपट | धूर | घरात खूप धुपट झालय. |
| ७ | निचेतीनं | सावकाश | तू निचीती जेव. |
| ८ | बिगीनं | लवकर | तू बिगी बिगी चल. |
| ९ | वटा | घरासमोरील किंवा मंदिरासमोरील बसण्याची जागा | मुलानो वट्यावर जाऊन बसा. |
| १० | व्हर्का | घरावरील छपर तयार करण्यासाठी वापरायची मोठ्या पानाची पेंढी | रानामध्ये जाऊन व्हर्का घेऊन ये. |
| ११ | वरतं | वर किंवा वरच्या बाजूला | पुस्तक वरतं ठेवलेलं हाय. |
| १२ | वरलाकड | वरच्या बाजूकडे | तो वरलाकड जाऊन आला. |
| १३ | अनुशापोटी | उपशिपोटी | ह्या गोळ्या अनुशापोटी घ्या. |
| १४ | आगळ | दार किंवा बंद करण्याचा पारंपरिक घटक | आगळ लावून घर बंद कर. |
| १५ | फडा | झाडू | अंगण फड्याने झाडून घे. |
| १६ | भाया | भाऊ किंवा मोठा भाऊ | माझा भाया शेतात गेला. |
| १७ | मावळा | मामा | माझा मावळा आज घरी आला होता. |
| १६ | मावळण | मामी | मावळणीनं मला जेवायला बोलावलं. |
| १७ | वाटी | लहान भांडे | वाटीत पाणी घेऊन ये. |
| २० | भगुनं | स्वयंपाकाचे भांडे किंवा भांडे | भगुन्यात भाजी ठेवली. |
| २२ | येळणी | पाणी पिण्याचे किंवा घेण्याचे पारंपरिक भांडे | येळणीत पाणी भर. |
| २३ | बुटलं | पाणी पिण्याचे लहान भांडे | बुटल्यातून पाणी प्याय. |
| २४ | ढब्बु | ढब्बू किंवा ढोबळी मिरची | आज भाजीला ढब्बु मिरची घातली. |
| २५ | राकीसम्होरं | पश्चिमेकडे किंवा सूर्यास्ताच्या दिशेकडे | राकीसम्होरं सूर्य मावळतो. |
| २६ | गंगाम्होरं | पूर्वेकडे किंवा विशिष्ट दिशेकडे वापरलेले प्रादेशिक रूप | घराचं तोंड गंगाम्होरं आहे. |
| २७ | परसाकड | शौचास जाने | तो परसाकडला गेला आहे. |
| २८ | निगलो | निघालो | मी आताच निघलो. |
| २९ | व्हळ | ओव्हाळ | तो व्हळाकडे गेला आहे. |
| ३० | कुंची | लहान मुलांना किंवा म्हाताऱ्या माणसांना पांगरण्याची वस्त्र | त्याला कुंची पांघर. |
| ३१ | नक्कर | थोडं | मला भात नक्कर दे. |
| ३२ | लई | जास्त | मला लई वाढू नकोस. |
| ३३ | उलस | थोडं | पाणी उलस उलस प्यावं. |
| ३४ | मांयदळ | भरपूर | यावर्षी शेतात मांयदळ पिकलं आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | केढोला | कोणत्या वेळी | तो केढोला येऊन गेला. |
| ३६ | येढोला | यावेळी | तो येढोला का आला होता. |
| ३७ | कवा | केव्हा | मी गावाकडे कवा कवा जातो. |
| ३८ | आयंदा | नाकामी व्यक्ती | तो नुसताच आयंदा आहे. |
| ३९ | आमदा | यावर्षी | आमदा पावसामुळे काहीच पिकणार नाही. |
| ४० | जवा | जेव्हा | तो जवा येईल तेंव्हा देऊ. |
| ४१ | निंदने | खुरपने | आई शेतामध्ये निंदन्यासाठी गेली आहे. |
| ४२ | सेंदने | विहीरतून पाणी काढणे | तू आडातून पाणी सेंदून आण. |
| ४२ | लपुट | खोटारडा | तो माणूस लपूट आहे. |
| ४३ | अबंड | भरपूर | त्या शेतात अबंड सोयाबीन पिकले होते. |
| ४४ | येरवी | इतरवेळी | येरवी तो चांगला असतो. |
| ४५ | उगीरवट | अर्थहीन बोलणारा | तो खूप उगीरवट आहे. |
| ४६ | उगी | विनाकारण | त्याने उगीच मला मारलं. |
| ४७ | शिवेवर | दोन्ही गावच्या मधील जागा | ते आमच्या गावच्या शिवेवर आहे. |
| ४८ | गरबगाळ | भयभीत | तो हिंस्र प्राणी पाहून गरबगाळ झाला. |
| ४९ | हाणतील | मारतील | तू वाईट बोलला तर धरून हाणतील. |
| 50 | पांदी | गावातील पानंद | तो पांदीने शेताकडे गेला आहे. |
| ५१ | बेंदाड | गटारीतील खराब पाणी | तो दारू पिल्यामुळे बेंदाडात जाऊन पडला आहे. |
| ५२ | डबक्यात | खराब पाणी आणि गटारीतील खोल खड्डा | तो डबक्यात पडला. |
| ५३ | डव्ह | डोह | आमच्या शेतामध्ये एक डव्ह आहे. |
| ५४ | बेनं | नाटकी पोरग | काय बेन्यासारख वागतो. |
| ५५ | टंबरेल | ग्रामीण भागामध्ये शौचास जाण्यासाठी वापरात येणारा डबा | ते एक टंबरेल घेऊन जा. |
| ५६ | घमेल | टोपलं | वाळू घमेल भरून आण. |
| ५७ | पेल्यात | ग्लासात | पेला भरून पाणी आण. |
| ५८ | देवळी | | |
| ५९ | लाचकन | घरगुती चिमटा | लाचकनाने काटा काढ. |
| ६० | मोळा | खिळा | तेथे मोळा पडला आहे |
| ६१ | मुंगसं | गाय किंवा बैल वनस्पती खाऊ नये म्हणून बांधण्यात आलेली जाळी | शेतातून जाताना गायीला मुंगसं घाल. |
| ६२ | भिताड | भिंत | तुझ तोंड भिताडाकडे कर. |
| ६३ | वकत | वेळ | या वक्ताला कोठे जातोस? |
| ६४ | धुरा | दोन्ही शेतामधील बांध | बैल धुऱ्यावर बांध. |
| ६५ | पारोसा | तोंड न धुतलेला | तू पारोसा बसू नको. |
| ६६ | खाराची फोड | आंब्याचं लोणचं | जेवणात खाराची एक फोड ठेव. |
| ६७ | येरवळी | वेळेवर | घराकडे येरवाळी येत चल. |
| ६८ | अरकट | शक्तिशाली | ती गाय अरकट आहे. |
| ६९ | अमंगळ | खराब | तू अमंगळपणे वागू नकोस. |
| ७० | मळ | अंगावरील घाण | अंगावर खूप मळ बसलेला आहे. |
| ७१ | चुगल्या | लावा लावी करणे | एकमेकाच्या चुगल्या लाऊ नये. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७२ | मातीला जाणे | अंत्यविधीला जाणे | मृत व्यक्तीच्या मातीला जावे लागते. |
| ७३ | खळ | धान्य काढण्यासाठीची जागा | सोयाबीन चे खळ पडलेलं आहे. |
| ७४ | दुरडी | भाकरी किंवा चपाती ठेवणारं लाकडी टोपलं | दुरडीत भाकर ठेव. |
| ७५ | आटोळा | शेतामध्ये उंच ठिकाणी पाखराला हकण्यासाठी चे ठिकाण | शेतात आटोळा तयार कर. |
| ७६ | हुळा | हुरडा | हरभऱ्याचा हुळा भाजा. |
| ७७ | रूमनं | नांगराची वरची मुठ | नांगरताना वरचे रूमनं पकडावे लागते. |
| ७८ | लोटकं | छोट्सं गाडगं | लोटक्यात पाणी भर. |
| ७९ | दाव | दोरी | |
| ८० | वावभर | डाव्या हाताच्या बोटा पासून ते उजव्या हाताच्या बोटापर्यंतचा भाग | या दोनीत वावभर अंतर आहे. |
| ८१ | ईत | करंगळी पासून मोठ्या अंगठ्यापर्यंत चे अंतर | ईतभर जमिनीसाठी भांडणे होतात. |
| ८२ | धाव | नांगराला लावलेली लोखंडी पट्टी | नांगराच्या खालच्या बाजूला लोखंडी धाव बसवलेली असते. |
| ८३ | विळा | गवत कापण्यासाठीचे साहित्य | गवत कापण्यासाठी विळा वापरतात. |
| ८४ | उकरी | शेंगा काढण्यासाठी वापरत येणार साहित्य | तू उकरीने शेंगा काढ. |
| ८५ | काणी | दोरीचा एक प्रकार | काणीने बैल बांध. |
| ८६ | वेसन | मारक्या गाय किंवा म्हशीला नाकामध्ये वापरात येणारे मोठे दोरी | मारक्या बैलाला वेसण घातले पाहिजे. |
| ८७ | कनिंग | धान्य साठविण्यासाठी वनस्पतींपासून तयार केलेले जागा | धान्य कनगीत घाल |
| ८८ | कसपट | कचरा | इकडे तिकडे कसपट टाकू नका. |
| ८९ | कोपटं | पालापाचोळ्या पासून तयार केलेले घर | खेडयात कोपटाचे घरे असतात. |
| ९० | पातेलं | एक भांड | त्या पातेल्यात पाणी टाक. |
| ९१ | मेनकापड | पॉलिथिन पिशवी | ताजी भाजी मेणकापडात ठेव. |
| ९२ | चरवी | एक मोठं पाणी ठेवण्यासाठी भांड | चरवीत पाणी ओत. |
| ९३ | मडकं | गाडगं | मडक्यात पाणी भर. |
| ९४ | डोस्क | डोकं | तुझ डोस्क ठिकाणावर आहे का? |
| ९५ | बुडाला | तळाला | घागर विहिरीच्या बुडाला गेली आहे. |
| ९६ | म्या | मी | म्या गावाकडे गेलो होतो. |
| ९७ | येळ | वेळ | हे येण्याची येळ नाही. |
| ९८ | फकस | फक्त | तू फकस होकार दे. |
| ९९ | कुठं | कोठे | ते कुठं गेले आहेत. |
| १०० | कवळा | कोवळा | अजून तो कवळा आहे. |
| १०१ | बुजगावनं | शेतामध्ये पाखरांना हाकण्यासाठी मानवासारखे चित्र | तू येथे बुजगावण्यासारख बसला आहे. |
| १०२ | निब्बर | घट्ट | ती शेंग निब्बर आहे. |
| १०३ | झापड | अंधार | आता झापड पडली आहे. |
| १०४ | तांबड फुटलं | सूर्य उगवला | तू तांबड फुटेपर्यंत झोपला होतास. |
| १०५ | चवकड | चोहीकडे | माणसाने चवकड लक्ष करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| १०६ | येगळा | वेगळा | तो रंग येगला आहे. |
| १०७ | हबाडा | झेप | मांजराने उंदरावर हबाडा मारला. |
| १०८ | घुस्सा | लोखंडी खोदकामासाठी वापरणारा प्रहार | खडा पाडण्यासाठी लोखंडी घुस्सायचा वापर करतात. |
| १०९ | टरफल | एखाद्या फळावरील किंवा बियावरील आवरण | शेंगाचे टरफल कोठेही टाकू नये. |
| ११० | चोथा | भुसा | ऊसाचा चोथा बाजूला सार. |
| १११ | पांचट | बेचव | त्याची चव खूप पांचट होती. |
| ११२ | बनिंम | वाळलेल्या पात्याच्या पेंडया तयार करून तयार करण्यात आलेला ढिग | ज्वारीच्या पेंढ्याची बनिंम तयार करा. |
| ११३ | भिंगरी | गरगर फिरणे | तो भिंग्रीवणी फिरतो. |
| ११४ | पुनिव | पोर्णिमा | दोन दिवसांनी पुनिव आहे. |
| ११५ | अमोशा | अमावस्या | पंधरा दिवसांनी अमोशा येते. |
| ११६ | कवाड | दरवाजा, दार | सर्व कवाडे व्यवस्थित लावा. |
| ११७ | कवूळ | कावीळ | तो कवूळ होऊन मेला. |
| ११८ | पडसं | सर्दी | मला खूप पडसं आलेलं आहे. |
| ११९ | मडं | मृत व्यक्ती | तेथे मडं पडलेलं आहे. |
| १२० | पाराजवळ | एखाद्या मंदिराजवळ | तो पारावर बसला आहे. |
| १२१ | तटकर | पायात घालणारी वाहन | ते तटकरबाजूला सार. |
| १२२ | जोडा | कातडयाचे पासून तयार केलेलं पायातीलवाहन | पायात जोडा घाला. |
| १२३ | तुटकं | तुटलेल्या | पायात तुटकी चप्पल घालू नये. |
| १२४ | फुटका | फुटलेलं | येथे फुटका डब्बा नको ठेवू. |
| १२५ | मफरेल | डोक्याभोवती वापरात येणारे एक कापड | त्याने डोक्याभोवती मफरेल बांधलेली होती. |
| १२६ | गमजा/पंजा | गळ्यामध्ये घातलेली दस्ती | त्याने गळ्यात गमजा घातलेला होता. |
| १२७ | शिकाळ | घरामध्ये उंचीवर दूध किंवा दही मांजर आणि उंदरापासून संरक्षण करण्यासाठी ठेवण्यात आलेला ठिकाण | दूध शिकाळयावर ठेव. |
| १२८ | शिळपट | कमजोर | तुम्ही शिळपटासारखे वागू नका. |
| १२९ | हिरवट | रागीट नजरेन बघणारा | तो माणूस खूप हिरवट आहे. |
| १३० | येडपट | वेडपट | तो दिसायला येडपट आहे. |
| १३१ | हावरट | हाव हाव करणारा | तो खूप हावरट आहे. |
| १३२ | फुगीर | थापा मारणारा | ती खूप फुगीर आहे. |
| १३३ | फेक्या | काहीही सांगणारा | तो कोणत्याही बातम्या फेकतो. |
| १३४ | घबाड | मोठी लाटरी लागलेला | त्याला खूप मोठं घबाड लागलं आहे. |
| १३५ | पळकुटा | भित्रा | तो पळकुटा आहे. |
| १३६ | भांमरट | योग्य रीतीने कोणतेही काम न करणारा | तो कोणतेही काम भांमरटल्यासारखे करतो. |
| १३७ | बेढब | न मोजता येणारा शरीर | तो दिसायला बेढब आहे. |
| १३८ | वक्टचिळ | खराब | ती दिसायला खूप वक्टचिळ आहे. |
| १३९ | परात | घरात वापरण्यात येणारी जेवणाची प्लेट | ते परात भरून आण |
| १४० | फापट | योग्य नसलेला | तसा फापट पसारा मांडू नका. |

| | | | |
|---|---|---|---|
| १४१ | वरवटा | दगड | त्याला फेकून वरवटा मार. |
| १४२ | म्होरं | पुढे | तो म्होरं गेला आहे. |
| १४३ | फुकारी | ग्रामीण भागामध्ये चुलीला हवा देण्यासाठी वापरणारी गोलाकार नळी | फुकारीने चुलीला हवा घाल. |
| १४४ | हेंदरट | व्यवस्थित काम न करणारा | तो माणूस हेंदरट आहे. |
| १४५ | हिबाळ | फेकून देणे | ते तिकडे हिबाळून दे. |
| १४६ | उठुस्तर | उठेपर्यंत | मी उठुस्तर तू जाऊन ये. |
| १४७ | कुड | पालापाचोळा माती आणि लाकड पासून तयार करण्यात आलेली भिंत | ते सर्व  कपडे कुडावर वाळू घाल. |
| १४८ | फोक | छडी | त्याला फोकाने बदडून काढ. |
| १४९ | आडरान | पडीक जमीन | ती जमीन खूप आडरान आहे. |
| १५० | मातकट | शरीर पूर्ण मळलेले | तू मातकट कपडे घालून येऊ नकोस. |
| १५१ | वावर | शेत | जनावरे वावरत गेले आहेत. |
| १५२ | खडूळ | गढूळ | पाणी खूप खडूळ आहे. |
| १५३ | चिकुल | चिखल | पावसामुळे खूप चिकुल झाला आहे. |
| १५४ | आटोळ्या | बोरामधील बिया | त्या बोरातील आटोळ्या आहेत. |
| १५५ | धामुका | बाभळीच्या बिया | खेळायला धामुके घेऊन ये. |
| १५६ | उकंडा | पालापाचोळा आणि शेण ज्या ठिकाणी टाकतात ती जागा | हे कचरा उकंडयात नेहून टाक |
| १५७ | केर | कचरा | हे केर उचलून घे. |
| १५८ | बाटुक | अतिशय छोटा | तो खूप बाटकासारखे दिसतो. |
| १५९ | कोय | आंब्याचे बी | ती आंब्याची कोय आहे. |
| १६० | गंगेकडे | उत्तरेकडे | तो गंगेकडे निघून गेला. |
| १६१ | राक्षसाकडे | दक्षिणेकडे | ती राक्षसाकडे गेली. |
| १६२ | वरलाकडे | पूर्वेकडे | तू वरलाकडे जा. |
| १६३ | खाल्लाकडे | पश्चिमेकडे | तो खाल्लाकडे गेला. |
| १६४ | ढवारा | धान्य काढल्यानंतर खळांची पूजा करण्यासाठी देण्यात येणारे जेवण | उद्या शेतात ढवारा आहे. |
| १६५ | शनवार | शनिवार | परवा शनवार आहे. |
| १६६ | आईतवार | रविवार | तो आईतवारी येणार होता. |
| १६७ | शिराळ | सावली | सद्या शिराळ पडलेलं आहे. |
| १६७ | सांच्यापारी | संध्याकाळी | तो सांच्यापारी येणार आहे. |
| १६८ | येळवस | वेळअमावस्या | तो येळवसीला येणार आहे. |
| १६९ | कुबड | वाकड | त्याला बसून बसून कुबड आलं आहे. |
| १७० | कासराभर | सूर्य माथ्यावर येणे | सूर्य कासराभर वर आलेला आहे. |
| १७१ | सजगूरा | बाजरी | ते सजगुराचे पिक आहे. |

**लातूर लोकबोलीतील शब्दांचे विषयानुसार वर्गीकरण**

**दैनंदिन व्यवहारातील शब्द:** *नादर, न्याहरी, नक्कर, लई, उलस, कवा, जवा, आयंदा, आमदा, येरवी, उगी, वकत, येळ* हे शब्द दैनंदिन संभाषणातील वापर दर्शवतात.

या प्रकारच्या शब्दांमधून बोलीची स्वतंत्र लय आणि स्थानिक उच्चारवैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

**कृषीविषयक शब्द:**लातूर जिल्ह्याची ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषीसंस्कृती बोलीभाषेत मोठ्या प्रमाणावर प्रतिबिंबित झालेली दिसते.

*सरकी, निंदने, सेंदने, खळ, आटोळा, रूमनं, दाव, धाव, उकरी, काणी, वेसन, कनिंग, धुरा, वावर, धामुका, आटोळ्या, उकंडा* हे शब्द कृषी व ग्रामीण जीवनाशी निगडित आहेत.

यावरून असे दिसते की लातूरची लोकबोली ही केवळ संभाषणाची पद्धत नसून पारंपरिक कृषिज्ञानाचे भाषिक भांडार आहे.

**घरगुती व पारंपरिक वस्तूंशी संबंधित शब्द:** *वटा, आगळ, फडा, वाटी, भगुनं, येळणी, बुटलं, घमेल, लाचकन, चरवी, मडकं, शिकाळ, परात, फुकारी, कुड* यांसारखे शब्द ग्रामीण घरगुती जीवनातील वस्तू आणि त्यांच्या उपयोगांचे प्रतिनिधित्व करतात. यातील काही वस्तू आणि त्यांची नावे आधुनिक घरगुती व्यवहारातूनही मागे पडत असल्याने त्यांच्यासोबत त्या शब्दांचेही विस्मरण होण्याची शक्यता आहे.

**दिशा व स्थान दर्शविणारे शब्द:** *राकीसम्होरं, गंगाम्होरं, वरलाकडे, गंगेकडे, राक्षसाकडे, खाल्लाकडे* यांसारख्या शब्दांतून दिशांचे स्थानिक भाषिक रूप दिसते.

विशेष म्हणजे या दिशावाचक शब्दांच्या वापरामागे स्थानिक भौगोलिक अनुभव आणि लोकांच्या दैनंदिन दिशाज्ञानाची परंपरा दडलेली असू शकते. त्यामुळे या शब्दांचा अभ्यास केवळ भाषाशास्त्रीय न राहता लोकभूगोलाशीही संबंधित ठरतो.

**काळ व कालवाचक शब्द:** *रातरशा, येळ, कवा, जवा, आयंदा, आमदा, शनवार, आईतवार, पुनिव, अमोशा, येळवस, सांच्यापारी* हे शब्द वेळ, दिवस, कालखंड किंवा धार्मिक-सांस्कृतिक दिनविशेष दर्शवतात.

**बोलीतील ध्वनी व रूपवैशिष्ट्ये**

तक्त्यातील शब्दांचे निरीक्षण केल्यास काही शब्दांमध्ये प्रमाण मराठीच्या तुलनेत ध्वनीरूपात स्पष्ट बदल आढळतो.

उदाहरणार्थ :

**डोके → डोस्क**
**मी → म्या**
**वेळ → येळ**
**वेगळा → येगळा**
**शनिवार → शनवार**
**रविवार → आईतवार**
**संध्याकाळी → सांच्यापारी**
**पुढे → म्होरं**
**फक्त → फकस**
**कोवळा → कवळा**
**अमावस्या → अमोशा**
**पौर्णिमा → पुनिव**

ही रूपे बोलीतील ध्वनीबदल, संक्षेप, स्थानिक उच्चार आणि ऐतिहासिक भाषिक परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाची प्राथमिक सामग्री उपलब्ध करून देतात.

तथापि, या रूपांना 'चुकीची मराठी' न म्हणता **प्रादेशिक भाषिक रूपे** म्हणून पाहणे अधिक शास्त्रीय दृष्टिकोन ठरेल.

**लोकबोली आणि ग्रामीण सांस्कृतिक वारसा**

लातूर लोकबोलीतील अनेक शब्दांमध्ये ग्रामीण जीवनाची सांस्कृतिक स्मृती साठवलेली आहे.

उदाहरणार्थ :

- *खळ* — धान्य काढण्याची जागा
- *ढवारा* — धान्य काढल्यानंतरची पारंपरिक पूजा/जेवण
- *वटा* — घरासमोरील किंवा मंदिरासमोरील बसण्याची जागा
- *शिकाळ* — दूध/दही उंचावर ठेवण्याची जागा
- *उकंडा* — पालापाचोळा व शेण टाकण्याची जागा
- *पांदी* — गावातील पानंद
- *आटोळा* — शेतातील पाखरांना हाकण्यासाठी उंच जागा
- *रूमनं* — नांगराची वरची मूठ
- *फुकारी* — चुलीला हवा देण्यासाठी वापरली जाणारी नळी.

**या शब्दांमधून ग्रामीण समाजातील पारंपरिक तंत्रज्ञान, शेतीपद्धती, स्वयंपाकपद्धती आणि सामाजिक जीवनाचे भाषिक दस्तऐवजीकरण होते.**

**लुप्त होण्याची संभाव्य कारणे:-**

**प्रमाण मराठीचा वाढता वापर:**शिक्षण, सरकारी व्यवहार आणि औपचारिक संवादात प्रमाण मराठीचा वापर असल्याने स्थानिक रूपांचा वापर मर्यादित होतो.

**शहरीकरण:**गावातून शहराकडे स्थलांतर झाल्याने विविध भाषिक समूहांशी संपर्क वाढतो आणि सर्वमान्य शब्दांचा वापर वाढतो.

**पिढ्यांतील भाषिक अंतर:**वृद्ध पिढीला परिचित असलेले अनेक शब्द तरुण पिढी वापरत नसल्यास त्यांचे आंतरपिढी हस्तांतरण खंडित होते.मराठवाड्यातील बोलीशब्दांच्या अभ्यासातही जुन्या पिढीतील काही शब्द तरुण पिढीमध्ये मुख्य प्रवाहातील किंवा मिश्र मराठीमुळे कमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**आधुनिक साधनांचा प्रभाव:**पारंपरिक वस्तूंचा वापर कमी झाल्याने त्या वस्तूंशी संबंधित शब्दही मागे पडतात. उदाहरणार्थ, पारंपरिक शेतीची साधने, घरगुती वस्तू आणि ग्रामीण तंत्रज्ञानाशी संबंधित शब्दांची हीच स्थिती होऊ शकते.

**डिजिटल माध्यमांचा प्रभाव:**सोशल मीडिया, मोबाईल संदेश, इंटरनेट आणि शैक्षणिक सामग्रीमध्ये प्रमाणभाषेचा वापर अधिक असल्याने स्थानिक बोलीला डिजिटल व्यासपीठावर पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही.

**संशोधनातील महत्त्वपूर्ण निरीक्षणे**

प्रस्तुत तक्त्याच्या विश्लेषणातून पुढील महत्त्वाची निरीक्षणे नोंदविता येतात :

1. लातूर लोकबोलीत ग्रामीण जीवनाशी संबंधित स्वतंत्र शब्दसंपदा मोठ्या प्रमाणावर आहे.
2. कृषीविषयक शब्दांची संख्या आणि विविधता लक्षणीय आहे.
3. पारंपरिक घरगुती वस्तूंसाठी स्वतंत्र स्थानिक शब्द आढळतात.
4. दिशा आणि स्थान दर्शविणाऱ्या शब्दांमध्ये प्रादेशिक वैशिष्ट्य दिसते.
5. काळ, दिवस आणि धार्मिक-सांस्कृतिक प्रसंगांसाठी स्वतंत्र रूपे आढळतात.

6. प्रमाण मराठीच्या तुलनेत अनेक शब्दांमध्ये ध्वनीबदल दिसून येतात.
7. काही शब्द हे वस्तू किंवा प्रथा कालबाह्य झाल्यास त्यांच्यासोबतच लुप्त होण्याच्या धोक्यात आहेत.
8. ही शब्दसंपदा लातूरच्या ग्रामीण सांस्कृतिक वारशाचे भाषिक दस्तऐवज म्हणून महत्त्वपूर्ण आहे.

## निष्कर्ष

लातूर जिल्ह्यातील लोकबोली ही मराठी भाषेच्या प्रादेशिक वैविध्याचा महत्त्वपूर्ण भाग आहे. प्रस्तुत तक्त्यात नोंदविलेल्या 171 शब्दांमधून लातूरच्या ग्रामीण समाजजीवनाचे, कृषीपरंपरेचे, घरगुती व्यवहाराचे, लोकसंस्कृतीचे आणि स्थानिक भाषिक अनुभवाचे समृद्ध प्रतिबिंब दिसून येते.

*सरकी, निंदने, सेंदने, खळ, रूमनं, धाव, उकरी, काणी, वेसन, कनिंग, धुरा, वावर* यांसारखे कृषीविषयक शब्द; *वटा, आगळ, येळणी, बुटलं, चरवी, शिकाळ, फुकारी* यांसारखे पारंपरिक वस्तूविषयक शब्द; तसेच *म्या, म्होरं, फकस, येळ, सांच्यापारी, अमोशा, पुनिव* यांसारखी दैनंदिन भाषिक रूपे लातूर लोकबोलीचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व अधोरेखित करतात. म्हणून लातूर लोकबोलीचे संवर्धन हे केवळ भाषेचे संवर्धन नसून **कृषीसंस्कृती, लोकज्ञान, ग्रामीण जीवनपद्धती आणि स्थानिक सांस्कृतिक स्मृतीचे संवर्धन** आहे.

या अभ्यासाच्या पुढील टप्प्यात लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून क्षेत्रीय नमुने घेऊन, प्रत्येक शब्दाचा **वयोगटानुसार वापर, वारंवारता, भौगोलिक प्रसार आणि आंतरपिढी हस्तांतरण** तपासल्यास लातूर लोकबोलीच्या भाषिक जीवनक्षमतेचे अधिक अचूक मूल्यांकन करता येईल.

**“बोलीतील शब्द वाचविणे म्हणजे त्या शब्दामागील लोकजीवन, लोकज्ञान आणि लोकस्मृती वाचविणे होय.”**

## संदर्भसूची

१. **मराठी विश्वकोश.** “बोलीभाषाविज्ञान (डायलेक्टॉलॉजी).” मराठी विश्वकोश, महाराष्ट्र शासन.
२. **राज्य मराठी विकास संस्था व डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ.** *मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण : प्रतिमांकन आणि आलेखन.*
३. **Survey of Dialects of the Marathi Language (SDML).** Deccan College (Deemed University), Pune & Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai.
४. **देशमुख, केशव सखाराम.** “मराठवाडी बोलीची खुमारी.” *महाराष्ट्र टाइम्स,* 18 फेब्रुवारी 2017.
५. **बोडखे, तुषार.** “हरवलेल्या मराठवाडी शब्दांचा अपूर्व शोध.” *महाराष्ट्र टाइम्स,* 27 फेब्रुवारी 2021.
६. **देशमुख, केशव.** “भाष्य : समाज ‘बोलता’ ठेवणारे भाषिक धन.” *सकाळ,* 2023.
७. **मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन.** *मराठी शब्दकोश व परिभाषाकोश.*
८. **प्रा.द.मा. माने.**’कृषी शब्दधन’.मुक्तरंग प्रकाशन,२०१९.

**Copyright & License:**

© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.